आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१४ मे २०२४ - मंगळवार

लोकसभा निवडणूकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. अर्जांची छाननी उद्या होणार असून अर्ज मागे घेण्याची तारीख १७ मे आहे. सातव्या टप्प्यात ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह अने नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नाशिकमध्ये सभा घेणार आहेत. दुपारी एक वाजता निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं मोदी यांची सभा होईल. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभादेखील नाशिकमध्ये उद्या होणार आहेत.

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात काल पत्र्याचं होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा १४ वर पोहोचला आहे, तर ४३ जण जखमी झाले आहेत. दुर्घटना स्थळी एनडीआरएफ, पोलीस, सीआरपीएफ, आणि अग्निशमन दलाचे जवान बचाव कार्य करत आहेत. या होर्डिंगच्या खाली अजूनही अनेक गाड्या अडकल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल अपघातस्थळी भेट दिली. अपघातातल्या मृतांच्या कुटुंबियांना त्यांनी ५ लाख रुपये मदत जाहीर केली असून जखमींच्या उपचारांचा खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचं ते यावेळी म्हणाले. याप्रकरणी होर्डिंगचा मालक भावेश भिडे आणि इतरांवर गुन्हा दाखल

झाला असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पंतनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश केवळे यांनी आकाशवाणीला दिली.

मुंबई उपनगरांचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयाला भेट देऊन दुर्घटनेतल्या जखमींची विचारपूस केली.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात नांदगाव शहरात एसटी आणि चारचाकी वाहनाच्या अपघातात तिघेजण मृत्यूमुखी पडले. अपघातात जखमी झालेल्या दोन वर्षाच्या बालकाला उपचारासाठी नाशिकला दाखल केलं आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवनात महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. राजभवनातले अधिकारी आणि कर्मचारी यांनीही महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली.

मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केलं. मंत्रालयातले अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

**हिंगोलीत** जिल्हाधिकाऱ्यांनी तर रत्नागिरीत निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय फेडरेशन कप एथलेटिक्स स्पर्धेत काल राज्याच्या आभा खटुआने शॉटपुट मध्ये सुवर्णपदक मिळवलं. तिने काल १८ पुर्णांक ४१ शतांश मीटरची फेक करत महिला गटातला राष्ट्रीय विक्रम नोंदवला. मात्र ऑलिंपिक्सच्या पात्रता फेरीसाठीचा १८ पूर्णांक ८० शतांश मीटरचा टप्पा तिला गाठता आला नाही.

**<><><><><>**

भीमा कोरेगाव प्रकरणी अटकेत असलेले गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयानं आज जामीन मंजूर केला. नवलखा हे चार वर्षांपासून कैदेत होते. या प्रकरणी अद्याप त्यांच्यावर आरोपही निश्चित झालेले नाहीत. या प्रकरणाची सुनावणी आणखी लांबणार असल्याचं मत नोंदवत न्यायलयानं हा जामीन मंजूर केला.
गौतम नवलखा यांना त्यांच्या घरीच झालेल्या नजरकैदेच्या सुरक्षेसाठीचा वीस लाख रुपयांचा खर्च भरण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

**<><><><>**

नाशिक जिल्ह्यात गेल्या आठवड्याच्या शेवटी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. चांदवड तालुक्यात वीज कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला तर सिन्नरमध्ये घराची भिंत कोसळल्यानं महिला जखमी झाल्याचं वृत्त आहे. अवकाळी पावसामुळं जिल्ह्यातल्या ४१ गावातल्या ५१३ हेक्टरवरची पिकं आणि फळबागांचं नुकसान झालं आहे.

**<><><><>**

एमडीएल अर्थात माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड चा आज अडिचशेवा वर्धापनदिन आहे. यानिमित्त माझगाव गोदीत आयोजित विशेष कार्यक्रमात संरक्षण सचिव गिरीधर अरमाने यांच्या हस्ते विविध उपक्रमाचं उदघाटन करण्यात आलं.

**<><><><>**

मुंबईसह कोकणात तुरळक ठिकाणी आज आणि उद्या उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता राज्याच्या उर्वरित भागात आज पाऊस पडेल असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज नवी दिल्लीत दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होईल. पावसामुळं कोलकता नाइट रायडर्स आणि गुजरात टायटन्समधला सामना काल रद्द झाला.

//<><><><><>//